# मेट्रो ३ मार्गिकेतील २२ वा बोगदा पूर्ण

## विद्यानगरी ते सीएसएमआयटी १ स्थानकादरम्यानचे भुयारीकरण पूर्ण

सकाळ वृत्तसेवा

### वैतरणा बोगदा पूर्ण करणारी पहिली मशीन

**कुलाबा -वांद्रे सिप्झ या पहिल्या भुयारी मेट्रो- ३ मार्गातील आझाद मैदान ते मुंबई सेंट्रलपर्यंत ३.८१२ किमी भुयारीकरण दोन महिन्यापूर्वी पूर्ण झाले होते. त्यामुळे डाऊनलाईन बोगदा पूर्ण करणारी मेट्रो- ३ प्रकल्पातील वैतरणा ही पहिली टीबीएम मशीन ठरली. केवळ २० महिन्यांत वैतरणा- १ या टनेल बोअरिंग मशीनने हा महत्त्वपूर्ण पल्ला गाठला होता. या प्रकल्पाचे काम एकूण सात भागांमध्ये विभागले आहे. सिद्धिविनायक ते धारावीदरम्यान सर्वात मोठा टप्पा आहे. यात ११.०२ किमीच्या भुयारीकरणापैकी ६.८९ किमी भुयारीकरणाचे काम पूर्ण झाले आहे.**



मुंबई, ता. ३ : मेट्रो ३ या कुलाबा-वांद्रे-सीप्झ भूमिगत मेट्रो कामाला वेग आला आहे. गुरुवारी या मार्गिकेतील बाविसाव्या बोगद्याचे काम पूर्ण झाले. टीबीएम गोदावरी २ ने पॅकेज ६ मधील विद्यानगरी ते सीएसएमआयटी १ या स्थानकांदरम्यान डाऊन लाईनच्या दिशेने २.८ किमी इतके अंतर २०४८ रिंग्जच्या सहाय्याने पूर्ण केले. गोदावरी २ हे कृष्णा २, वैतरणा १, वैनगंगा-१, सूर्या १ यानंतर मेट्रो- ३ मार्गिकेच्या भुयारीकरणाचे महत्त्वपूर्ण काम पूर्ण करणारे सहावे टीबीएम ठरले आहे.

कुलाबा-वांद्रे सीप्झ या संपूर्ण मार्गिकेचे एकूण ५६ किमी (अप आणि डाऊन) भुयारीकरणाचे काम टीबीएमद्वारे प्रगतिपथावर आहे. हा मार्ग देशातील सर्वात लांब पूर्णतः भुयारी मार्ग आहे. आतापर्यंत यातील ३३ किमी मार्गिकेचे काम पूर्ण झाले आहे. भुयारीकरणाचे काम तब्बल १७ टीबीएमच्या साहाय्याने सुरू असून ही टीबीएम जमिनीत उतरवण्यासाठी मुंबईतील कप परेड, इरॉस, आझाद मैदान, सायन म्युझिअम, सिद्धिविनायक मंदिर, नया नगर, बीकेसी, विद्यानगरी, पाली मैदान, सारीपुत, सहार रोड आणि आंतरराष्ट्रीय विमानतळ टी-२ येथे शाफ्ट तयार केले आहे.

भुयारीकरणासोबतच खोदकाम, बेस स्लॅब, कॉर्नकोर्स स्लॅब, कॉलम तसेच भिंतीची बांधणी यांसारखी कामेही युद्धपातळीवर सुरू आहेत. पूर्णपणे भूमिगत असणाऱ्या या मार्गिकेवर एकूण २७ थांबे आहेत.